मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# राखीच्या धाग्याने विणला 'सुरक्षेचा विश्वास'

## विद्यार्थिनींकडून अग्निशमन विभागाच्या जवानांसोबत अनोखा रक्षाबंधन

**पिंपरी | प्रतिनिधी**

रक्षाबंधनाचा सण म्हणजे बहीण-भावाच्या प्रेमाचे प्रतीक. यंदाचा रक्षाबंधन दिवस पिंपरी चिंचवडमधील अग्निशमन विभागासाठी खास ठरला आहे. यावर्षी अग्निशमन विभागाच्या पिंपरी येथील मुख्य अग्निशमन केंद्रातील जवानांना, चिखली येथील इनोव्हेशन वर्ल्ड स्कूल या शाळेच्या इयत्ता तिसरीतील विद्यार्थिनींनी राख्या बांधून रक्षाबंधन साजरे केले.

अग्निशमन केंद्राच्या मुख्यालयात आयोजित या विशेष उपक्रमात शाळेच्या ४ ते ८ वयोगटातील सुमारे २० चिमुकल्यांनी सहभाग घेतला. यावेळी "ये रक्षाबंधन सबसे बडा त्योहार है" हे गाणं म्हणत, जवानांना राखी बांधून रक्षाबंधन सणानिमित्त शुभेच्छा दिल्या. या छोट्याशा हृदयस्पर्शी उपक्रमामुळे उपस्थित सर्वजण भारावून गेले.





मुलांमध्ये समाजासाठी कार्य करणाऱ्यांविषयी आदराची भावना लहानपणापासून रुजावी, या उद्देशाने या उपक्रमाची कल्पना साकारली गेली. पालक आणि विद्यार्थ्यांनी याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सण साजरा करणं हा या उपक्रमाचा मुख्य हेतू नव्हताच, तर समाजात खऱ्या अर्थाने रक्षण करणाऱ्या जवानांना सलाम करणे, त्यांच्या कार्याची ओळख मुलांना करून देणे आणि त्यांच्याशी भावनिक नातं निर्माण करणे हा मुख्य हेतू होता, असे शाळेच्या शिक्षिकांनी सांगितले.

यावेळी मुलांनी उपस्थित अग्निशामक जवानांना "तुम्ही आग कशी विझवता?", "घाबरत नाही का?", "तुमचं कुटुंब कुठे आहे?" यांसारखे प्रश्न विचारले. अग्निशामक जवानांनी या लहानग्या मुलींसोबत संवाद साधला आणि त्यांना भेटवस्तूही दिल्या.

> " राखी ही फक्त भावनिक नात्याची खूण नाही, तर समाजातील रक्षकांप्रती असलेली कृतज्ञता आणि जिव्हाळ्याचं प्रतीक आहे. जेव्हा ती आपल्या अग्निशमन जवानांच्या हातावर बांधली जाते, तेव्हा ती सामाजिक जबाबदारीचा धागा ठरतो. लहान मुलांनी आपत्कालीन सेवा देणाऱ्या जवानांना बांधलेली राखी ही सामाजिक बांधिलकीची साक्ष आहे. हा क्षण संपूर्ण विभागासाठी अत्यंत अभिमानाचा आणि प्रेरणादायी ठरला आहे.
>
> **- उमेश ढाकणे, सहाय्यक आयुक्त, अग्निशमन विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

> " या चिमुकल्यांनी आमच्या केंद्रात येऊन रक्षाबंधन साजरे केले. रोज मृत्यूच्या सावलीत काम करणाऱ्या आमच्या जवानांसाठी ही राखी म्हणजे प्रेरणेचा, प्रेमाचा आणि जबाबदारीचा नवा धागा आहे. असे उपक्रम केवळ जवानांचे मनोबल वाढवत नाहीत, तर समाजात आपत्कालीन सेवांबाबत जागरूकता आणि आदरही निर्माण करतात.
>
> **– संतोष सरोटे, वरिष्ठ अग्निशामक जवान, पिंपरी चिंचवड महापालिका.**

---

# महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी जवानांसाठी पाठवल्या राख्या

## उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या हस्तकला, नवनिर्मिती आणि पुनर्वापर कौशल्याला चालना मिळाली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या भोसरी येथील इंद्रायणीनगर प्राथमिक शाळेत देशप्रेम, सर्जनशीलता आणि पर्यावरणपूरकता यांचा सुंदर संगम घडवणारा आगळा वेगळा उपक्रम राबवण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांनी लेह लडाखमधील आपल्या वीर जवानांसाठी स्वतः हाताने राख्या तयार करून पाठवल्या आहेत.




हा उपक्रम आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, प्रशासनाधिकारी संगीता बांगर यांच्या संकल्पनेतून व शाळेच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला आहे.

उपक्रम यशस्वीतेसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका आणि माजी मुख्याध्यापिका शैला मातेरे यांचा विशेष सहभाग आहे. मातेरे या पर्यटक म्हणून लेह-लडाखला जाणार असल्याची माहिती विद्यार्थ्यांना मिळाल्यावर त्यांनी सैनिकांसाठी राख्या तयार करण्याचा निर्णय घेतला. यासाठी विद्यार्थ्यांनी 'टाकाऊतून टिकाऊ' या संकल्पनेनुसार घरातील व शाळेत उपलब्ध असलेल्या टाकाऊ वस्तूंचा वापर केला. कागद, फिती, मोती, दोरे, जुनी सजावटीची साहित्ये अशा विविध वस्तूंमधून रंगीबेरंगी आणि आकर्षक राख्या तयार केल्या.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या हस्तकला, नवनिर्मिती आणि पुनर्वापर कौशल्याला चालना मिळाली आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या लहानशा योगदानातून देशाच्या सीमेवर तैनात असलेल्या सैनिकांना भावनिक संदेश देण्याचा प्रयत्न केला. सीमेवरचे जवान हेच आमचे खरे रक्षक आहेत, अशी भावना विद्यार्थ्यांनी यावेळी व्यक्त केली.

# मुंबईनंतर आता पुण्यातील कबुतरबंदीचा वाद!

## शहरातील 20 सार्वजनिक ठिकाणी कबुतरांनी खाद्य देण्यास बंदी घालण्यात आली



**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेने शहरात २० सार्वजनिक ठिकाणी कबुतरांना खाद्य देण्यास २०२३ मध्ये बंदी केली. या बंदीचे उल्लंघन करणाऱ्या नागरिकांवर महापालिकेकडून दंडात्मक कारवाई केली जाते. या बंदीला आव्हान देणारी याचिका पुण्यातील शाश्वत फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेने उच्च न्यायालयात दाखल केली आहे. यामुळे मुंबईनंतर आता पुण्यातील कबुतरांच्या खाद्यबंदीचा वाद न्यायालयाच्या दारी पोहोचला आहे.

पुणे महापालिकेच्या आरोग्यप्रमुखांना १० मार्च २०२३ रोजी शहरातील सर्व कबुतरखाने बंद करण्याचे आदेश दिले होते. याचबरोबर शहरातील २० सार्वजनिक ठिकाणी कबुतरांनी खाद्य देण्यास बंदी घालण्यात आली. या बंदीचे उल्लंघन केल्यास नागरिकांना ५०० रुपये दंड करण्याची कारवाई मोहीम महापालिकेने हाती घेतली. या बंदीविरोधात शाश्वत फाउंडेशनने महापालिका आयुक्तांकडे दाद मागितली होती. ही बंदी मागे घेण्याची मागणी फाउंडेशनने केली होती. याचबरोबरबर राज्य प्राणी कल्याण मंडळ आणि पशुसंवर्धन विभागालाही पत्र पाठविले होते. याप्रकरणी शासकीय यंत्रणांकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्याचे शाश्वत फाउंडेशनने म्हटले आहे.

उच्च न्यायालयासमोर या याचिकेवर ७ ऑगस्टला सुनावणी झाली. या सुनावणीवेळी उच्च न्यायालयाने कबुतरांच्या विष्ठेमुळे आरोग्यास होणाऱ्या हानीबाबत अनेक वैद्यकीय संशोधने उपलब्ध असल्याचे नमूद केले. याप्रकरणी तज्ज्ञ समिती नेमण्याबाबत महाधिवक्त्यांनी बाजू मांडावी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. या समितीत बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी (बीएनएचएस), भारतीय प्राणी कल्याण मंडळ आणि इतर घटकांचा समावेश करावा, असेही न्यायालयाने सुचविले. याप्रकरणी पुणे महापालिकेला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने दिले आहेत. या याचिकेवरील पुढील सुनावणी १३ ऑगस्टला होणार आहे.

### महापालिकेकडे अर्ज करण्याची मुभा

» कबुतरांना खाद्य देण्यासाठी परवानगी द्यावी, अशी मागणी करणारा अर्ज शाश्वत फाउंडेशनला पुणे महापालिकेकडे करता येईल. महापालिका आयुक्त त्यावर नियमानुसार निर्णय घेतील. यात सार्वजनिक आरोग्याचा विचार व्यापक दृष्टिकोनातून विचार आवश्यक आहे. महापालिकेने फाउंडेशनचा अर्ज नामंजूर केल्यास त्यांना आमच्याकडे दाद मागता येईल, असेही उच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

> कबुतरांना खाद्य देण्यास मनाई करणे हे कायद्यानुसार योग्य नाही. कबुतरांच्या विष्ठेमुळे मानवी आरोग्याला हानी पोहोचत असल्याने सफाई ठेवण्याचे काम महापालिकेने करावे. कबुतरांना जगण्याचा अधिकार असून, तो अशाप्रकारे खाद्यबंदी करून हिरावून घेता येणार नाही.
>
> **- आशापूर्णा अंबेकर, याचिकाकर्त्या व अध्यक्षा, शाश्वत फाउंडेशन.**

# आयटी पार्कमधील स्थानिक ग्रामस्थांना अजितदादांना दिलं मोठं गिफ्ट

## आयटी पार्कमध्ये प्रस्तावित रस्ते रुंदीकरणावरुन निर्माण झालेला तिढा अखेर सुटला



**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधील स्थानिक ग्रामपंचायतींनी गावठाणाच्या हद्दीत प्रस्तावित रस्ता रुंदीकरणाला विरोध केला होता. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्थानिकांशी शुक्रवारी चर्चा केली. त्यात आयटी पार्कमध्ये गावठाणांच्या हद्दीत रस्त्यांची रुंदी कमी ठेवण्याची स्थानिक ग्रामपंचायतींची मागणी त्यांनी मान्य केली. यामुळे आयटी पार्कमध्ये प्रस्तावित रस्ते रुंदीकरणावरून निर्माण झालेला तिढा अखेर सुटला आहे.

उपमुख्यमंत्री पवार यांनी चाकण औद्योगिक क्षेत्राची शुक्रवारी पहाटे पाहणी केली. त्यानंतर त्यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) मुख्यालयात आढावा बैठक घेतली. आयटी पार्कमधील हिंजवडी आणि ग्रामपंचायतींनी प्रस्तावित रस्ते रुंदी कमी ठेवावी, असा ठराव ग्रामसभेत मंजूर केला होता. या पार्श्वभूमीवर या गावांतील ग्रामस्थांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन त्यांच्यासमोर मागण्या मांडल्या. यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेऊन गावठाणांच्या हद्दीत रस्त्यांची रुंदी कमी ठेवण्याचे आश्वासन दिले. याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी पीएमआरडीएला दिले.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, चाकण औद्योगिक क्षेत्र परिसर आणि हिंजवडी आयटी पार्कमध्ये खराब रस्ते आणि वाहतूक कोंडीमुळे व्यवसायिक, कामगार, वाहनधारकांना अनेक अडचणी येतात. या भागात अतिक्रमणधारकांची संख्या अधिक असल्याने वाहतूक कोंडीची समस्या कायम आहे. त्यामुळे अतिक्रमण हटाव मोहीम राबवत तातडीने अरुंद असलेले रस्ते रुंद करण्यासाठी पावले उचलणे अपेक्षित आहे. अतिक्रमण काढल्यानंतर त्या ठिकाणी रस्ते विकसित झाले नाही तर पुन्हा अतिक्रमण वाढते. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणांनी समन्वयातून अतिक्रमण काढल्यानंतर तातडीने रस्ते विकसित करण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करावा.

### चाकण परिसरात ट्रक टर्मिनल

» चाकणसह परिसरात येणाऱ्या अवजड वाहनांची संख्या अधिक असल्याने वाहतूक कोंडी होते. त्यामुळे अशा वाहनांवर ठराविक वेळेची बंधने घालत एमआयडीसी भागात ट्रक टर्मिनल सुरू करण्यावर भर द्यावा. वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी प्रादेशिक परिवहन विभागासह पोलीस यंत्रणेने संयुक्तपणे नियोजन करणे अपेक्षित आहे. यासह कचऱ्याची समस्या निकाली काढत या भागातील अतिक्रमणे तातडीने काढावी. रस्ते विकसित करताना जर कोणी चुकीची भूमिका घेत असेल तर त्यांच्यावर नियमानुसार गुन्हे दाखल करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले.

> राजीव गांधी इन्फोटेक पार्क परिसरात गावठाणाच्या हद्दीत रस्त्यांची रुंदी कमी ठेवावी, अशी स्थानिक ग्रामपंचायतींची मागणी होती. त्यावर उपमुख्यमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेतली. या अनुषंगाने विकास आराखड्यात सुधारणा केल्या जाणार आहेत. आयटी पार्कमध्ये गावठाणे वगळता इतर ठिकाणी मात्र रस्त्यांची रुंदी विकास आराखड्याप्रमाणे राहील.
>
> **– डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए.**

# शहरात होणार नवीन पाच पोलिस ठाणी

## दोन उपायुक्तांच्या मागणीसही लवकरच मान्यता; मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा

**पुणे | प्रतिनिधी**

पोलीस आयुक्तालयांतर्गत पाच नव्या पोलीस ठाण्यांच्या मंजुरीची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि. ८) पुण्यात केली. लोहगाव, लक्ष्मीनगर, नऱ्हे, मांजरी, येवलेवाडी अशी ही पाच पोलीस ठाणी असतील. तसेच त्यासाठी लागणाऱ्या एक हजार मनुष्यबळाला मान्यता देण्यात येईल आणि दोन पोलीस उपायुक्त देण्याबाबत येत्या काळात मान्यता देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.




पोलीस दलासमोर असणारी नवीन आव्हाने आणि कायदा-सुव्यवस्थेच्या बदलत्या प्रश्नांचा विचार करून, तब्बल ६० वर्षांनंतर पोलीस दलासाठी नवीन आकृतीबंध तयार करण्यात आला आहे. या नवीन संरचनेनुसार, पोलीस ठाण्यांची पुनर्रचना करण्यात आली असून, अंमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांसाठी नार्कोटिक्स युनिट आणि न्यायसहाय्यक तपासासाठी फॉरेन्सिक युनिट स्थापन करण्यात आल्याचे यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

शहराच्या सुरक्षेसाठी आता देशातील सर्वात आधुनिक सीसीटीव्ही प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाने युक्त असा नियंत्रण कक्ष जोडण्यात आला आहे. या आधी ऑगस्ट २०१५ मध्ये सीसीटीव्ही प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन झाले होते. आता या नवीन प्रणालीमुळे वाहतुकीचे प्रभावी नियंत्रण करणे शक्य होणार आहे. तसेच, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने गुन्ह्यांचे आणि विविध परिस्थितींचे विश्लेषण करणे सोपे होईल. या अत्याधुनिक यंत्रणेमुळे गुन्हेगारांचा तात्काळ शोध घेणे शक्य होणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. याशिवाय, पोलिसांच्या अंमली पदार्थविरोधी मोहिमेचे आणि विधी संघर्षग्रस्त बालकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवणाऱ्या 'मिशन परिवर्तन' प्रकल्पाबद्दलही त्यांनी पोलिसांचे कौतुक केले.

तर, पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन्ही शहरांत कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दलाला आधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. शासनाने राज्यातील जिल्हा वार्षिक योजनेमध्ये ५ टक्के म्हणजेच अकराशे कोटी रुपये पोलीस दलासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या निधीतून पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे ग्रामीण भागातील पोलीस दलाला गेल्या दोन वर्षांत जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ४० कोटींचा निधी देण्यात आल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

### शहरातील टेकड्या होणार सुरक्षित

» शहराच्या सुरक्षिततेसाठी आता तंत्रज्ञानाचा वापर करून निर्जन आणि निर्मनुष्य जागांवर लक्ष ठेवण्यात येणार आहे. या प्रकल्पाची सुरुवात बोपदेव घाटापासून झाली आहे. तसेच पुढील दोन वर्षांत शहरातील अशा २२ टेकड्यांवर ही यंत्रणा कार्यान्वित केली जाईल. या यंत्रणेतील कॅमेऱ्यांमध्ये काही बिघाड झाल्यास किंवा ते बंद पडल्यास नियंत्रण कक्षाला त्वरित सूचना मिळेल आणि २४ तासांच्या आत या कॅमेऱ्यांची दुरुस्ती केली जाईल. तसेच एकाच वेळी पाच टक्क्यांपेक्षा अधिक कॅमेरे बंद राहता कामा नये अशी सोय करण्यात आली आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विविध प्रकल्पांचे भूमिपूजन आणि उद्घाटन**

शिवाजीनगर येथील पोलीस मुख्यालयात आयोजित पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या विविध प्रकल्पांच्या भूमिपूजन आणि नवीन उपक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, अपर मुख्य सचिव (गृह) इक्बालसिंह चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक अर्चना त्यागी, आयुक्त अमितेश कुमार आणि सहआयुक्त रंजन कुमार शर्मा उपस्थित होते. यावेळी 'दृष्टी' इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटर आणि चंदननगर पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतीचे उद्घाटन, तसेच लोणीकाळभोर, नांदेड सिटी, खराडी, कोंढवा पोलीस ठाण्यांच्या नियोजित इमारतींचे भूमिपूजन दूरदृष्यप्रणालीद्वारे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. तसेच पाच मोबाईल सर्वेलन्स व्हॅनचे आणि ड्रोनचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांनी केले.

# टिळक रस्त्यावर 1, 2 ढोल-ताशा पथकांना परवानगी

## मागील वर्षी 30 ते 32 तासांचा रेकॉर्ड; विसर्जन मिरवणूकही यंदा रात्री 12 च्या आत संपणार?

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील विसर्जन सोहळ्यात टिळक रस्त्यावरील मिरवणुका अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी सायंकाळपर्यंत सुरु असतात. मागील वर्षी ३० ते ३२ तासांचा रेकॉर्ड झाला होता. यंदा टिळक रस्त्यावरील विसर्जन मिरवणूक रात्री १२ वाजेपर्यंत संपवण्याचा प्रयत्न मंडळ आणि पोलिस प्रशासन करणार आहेत. पोलिस प्रशासन आणि टिळक रस्त्यावरील मंडळांमध्ये बैठक झाली. यावेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.



टिळक रस्त्यावरील विसर्जन मिरवणुकीत यंदा एक-दोन ढोल-ताशा पथकांना सहभागी होण्यास परवानगी देण्यात आली आहे. मिरवणुक लवकर संपवावी म्हणून यंदा टिळक रस्ता गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक समितीच्या सदस्यांनी पुढाकार घेतला आहे. दरवर्षी टिळक रस्त्यावरील पूरम आणि जेधे चौकात मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. अनेक मंडळांना तासंतास या चौकांमध्ये थांबून राहावे लागते. त्यामुळे आता जेधे चौक आणि पूरम चौकात ढोल-ताशासह साउंड सिस्टीम (डिजे) वाजविण्यास बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जेधे चौकातून सहभागी होणाऱ्या मंडळांनी ५ तासात, तर पूरम चौकातून सहभागी होणाऱ्या मंडळाने ४ तासात मिरवणूक संपवावी, यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहे.

दरवर्षी पूरम आणि जेधे चौकातून जवळपास २०५ मंडळ जातात. मिरवणुक लवकर संपवावी म्हणून यंदा टिळक रस्ता गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक समितीच्या सदस्यांनी पुढाकार घेतला आहे. दुर्घटना टाळण्याठी विक्रेत्यांची मुख्य रस्त्याऐवजी अंतर्गत रस्त्यावर व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच विसर्जन मिरवणूक रात्री बारा वाजता संपविण्यासाठी मंडळ आणि पोलिस प्रशासन प्रयत्न करणार आहेत.

# चुकार रिक्षावाल्यांना आणणार वठणीवर

## अवघ्या तीन महिन्यांच्या कालावधीत तब्बल 252 तक्रारी आल्यानंतर ही कारवाई हाती घेण्यात आली

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे विभागीय प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) बेकायदा वर्तन करणाऱ्या रिक्षाचालकांवर मोठी मोहीम सुरू केली आहे. अवघ्या तीन महिन्यांच्या कालावधीत तब्बल २५२ तक्रारी आल्यानंतर ही कारवाई हाती घेण्यात आली. हजारो प्रवाशांना रिक्षाचालकांच्या भाडे नाकारणे, उद्धट वागणूक, जादा भाडे आकारणे, तसेच गैरवर्तन अशा समस्यांना सामोरे जावे लागते आहे.




सहजसुंदर, निवांत जीवनशैलीसाठी ओळखले जाणारे पुणे आता महानगरात रूपांतरित होत आहे. सध्या मात्र ऑटो रिक्षा लॉबीवर दबाव वाढला आहे. पुण्याचे त्रस्त प्रवासी हे बारकाईने पाहत आहेत, आणि ही मोहीम केवळ काही दिवसांची न राहता शहरातील रस्त्यांवर नव्या संस्कृतीची सुरुवात ठरेल अशी अपेक्षा व्यक्त करत आहेत. शहरात २.५ लाखांहून अधिक नोंदणीकृत ऑटो रिक्षा असल्याने, सार्वजनिक वाहतुकीत विशेषतः रिक्षांची भूमिका महत्त्वाची आहे.

विशेष म्हणजे, काही रिक्षा संघटनांनी स्वतःच सदस्यांना नियम पाळण्याचे आवाहन केले आहे. काहींनी चालकांना सभ्य वागणूक ठेवण्यास व मीटरचे पालन करण्यासंबंधी सूचना दिल्या आहेत.

### ही कारवाई खूप उशिराने झाली

अधिकृत आकडेवारीनुसार, आलेल्या २५२ तक्रारींपैकी १७५ रिक्षाचालकांना नोटिसा देण्यात आल्या असून उर्वरित प्रकरणांवर काम सुरू आहे. या तक्रारींपैकी ३० 'मीटर फास्ट' बाबत, १०२ 'भाडे नाकारण्याबाबत', ६५ 'जादा भाडे आकारणे' तर, ५५ 'गैरवर्तन' यासंबंधी आहेत. ही कारवाई पुणेकर प्रवाशांमधील अनेक वर्षांच्या वाढत्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आली आहे. शेकडो नागरिकांनी हेल्पलाईन्स व तक्रार पोर्टल्सचा वापर सुरू केल्यानंतर आरटीओला कठोर पावले उचलावी लागली. नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत करत "ही कारवाई खूप उशिराने झाली" असे म्हटले आहे.

### अशा चालकांची नावे काळ्या यादीत टाका

» दररोज एखाद्या रिक्षाचालकाला अगदी जवळचे अंतर गाठण्यासाठी पटवून सांगणे हीच एक लढाई असते. त्यांचा अहंकार व नकार देणे आता सामान्य झाले आहे, असे हिंजवडीतील तंत्रज्ञ स्वराली शिंदे म्हणाल्या. ही कारवाई आम्हाला आशा देते. ही केवळ सुरुवात आहे. पुढील आठवड्यांत अचानक तपासण्या, परवाना निलंबन, मार्गांचे निरीक्षण वाढवले जाईल. पुनःपुन्हा गुन्हा करणाऱ्यांचे परवाने तात्पुरते रद्द केले जातील किंवा मोठा दंड ठोठावला जाईल, आणि गंभीर प्रकरणांत परवानाही कायमचा रद्द केला जाईल. आम्ही अशा चालकांची नावे काळ्या यादीत टाकली आहेत आणि ते परवान्यासाठी संपर्क साधल्यास थेट कारवाई केली जाईल.

> "नागरिक आमच्या ८२७५३३०१०१ या क्रमांकावर कॉल करून, रिक्षेचा क्रमांक दिसेल अशा फोटोसह तक्रार नोंदवू शकतात. तसेच, संबंधित माहिती व क्रमांक आम्हाला कळवू शकतात. त्यानुसार आम्ही कारवाई करतो.
>
> **– स्वप्निल भोसले,**
> **उप प्रादेशिक परिवहन अधिकारी**

# बारामतीत शिकाऊ विमानाचे चाक निखळल्याने अपघात

## विमान कोणाच्या घरावर कोसळले, तर त्याची जबाबदारी कोण घेणार, भाजप पदाधिकाऱ्याचा सवाल

**पुणे | प्रतिनिधी**

बारामतीविमानतळावर शनिवारी (दि ९ ) सकाळी ७:४५ वाजता बारामती येथील रेड बर्ड एव्हीएशन या खासगी विमान प्रशिक्षण संस्थेच्या विमानाला अपघात झाला. विवेक यादव (वय २४ वर्षे, मुंबई) हा प्रशिक्षणार्थी पायलट सदर विमान उडवत होता. नेहमीप्रमाणे प्रशिक्षणासाठी उड्डाण घेतल्यानंतर काही वेळातच विमानाच्या पुढील टायरमध्ये तांत्रिक बिघाड होऊन टायर वाकडे झाले आणि निखळले. रेड बर्ड चा हा गेल्या दोन वर्षातील तिसरा विमान अपघात आहे.

सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी झालेले नाही, मात्र या अपघातामुळे बारामतीतील नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सदर विमान जर एखाद्या घरावर, शाळेवर किंवा एमआयडीसीमधील एखाद्या कंपनीवर कोसळले असते, तर मोठी दुर्घटना घडली असती आणि जीवितहानी अटळ होती.



रेड बर्ड एव्हीएशन या संस्थेविरोधात यापूर्वीही अनेक वेळा तक्रारी करण्यात आल्या आहेत. तरी देखील यावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. या संस्थेला नागरिकांच्या सुरक्षेचे कोणतेही गांभीर्य नाही. हे विमान शहराच्या रहिवासी भागाजवळून, शाळांजवळून आणि औद्योगिक कंपन्यांच्या वरून उड्डाण करत असल्याने, प्रत्येक नागरिकाच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. या अपघाताची सखोल चौकशी करण्यात यावी. संस्थेवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. शहराच्या नागरी वसाहतीजवळून होणारी प्रशिक्षण उड्डाणे थांबवण्यात यावीत. बारामतीतील नागरिकांच्या सुरक्षेसाठी कायमस्वरूपी उपाययोजना राबवण्यात याव्यात. या गंभीर प्रकाराची प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी. यासंदर्भात लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री मुरलीधर मोहोळ यांची भेट घेऊन सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. बारामतीचे नागरिक सुरक्षित नाहीत. उद्या जर एखादे विमान कोणाच्या घरावर किंवा कंपनीवर कोसळले, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? असा सवाल भाजपा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस वैभव सोलनकर यांनी केला आहे. विशेष म्हणजे दिवसांपूर्वी सोलनकर यांनी केंद्रीय विमान उड्डाणं मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे रेड बर्ड या संस्थेविषयी तक्रार करीत चौकशी करण्याची मागणी केली आहे.